# ३. आजी : कुटुंबाचं आगळ

## कृती

### 1) पाठात आलेल्या खेळांचे वर्गीकरण करा.

**बैठे खेळ**

उत्तर :

**बैठे खेळ**

- खापराच्या भिंगऱ्या
- चिंचोके
- जिबल्या
- भोवरा
- गजग

**मैदानी खेळ**

उत्तर :

**मैदानी खेळ**

- गोट्या
- शिवणापाणी
- विहिरीत पोहणे

2) खालील मुद्द्यांच्या आधारे आजीचे शब्दचित्र रेखाटा.

**आजी**

- आजीचे दिसणे.
- आजीचे राहणीमान.
- आजीची शिस्त.

उत्तर :

**1) आजीचे दिसणे** - वयाची सत्तरावी ओलांडली तरी तिचा कणा ताठ होता. तिला काठीची गरज नव्हती. केस पांढरे व चेहऱ्यावर सुरकुत्या असल्या तरी तिच्या चेहऱ्याची ठेवण अशी होती की तारुण्यात ती किती सुंदर असेल याची जाणीव व्हायची, सर्व दात शाबूत होते व मोत्यासारखे चमकत होते.

**2) आजीचे राहणीमान** - पायात जुन्या वळणाच्या नालाच्या वहाणा, अंगात चोळी, हिरवं आणि लाल अशी दोन रंगांची नऊवारी इरकल लुगडी, कपाळावरचं गोदंण दिसू नये म्हणून त्यावर लावलेला बुक्का असे आजीचे राहणीमान होते.

**3) आजीची शिस्त** - आजीनं घरच्या सर्व स्त्रियांना कामाच्या वाटण्या करून दिल्या होत्या. कुणी किती दिवस भाकरी करायच्या, कुणी धुण धुवयाचं, भांडी घासायची हे तिनं ठरवून दिलं होतं आणि आठवड्यानं प्रत्येकीचं काम रोटेशनप्रमाणे बदलत जायचं, प्रत्येकीला प्रत्येक काम आलंच पाहिजे असा तिचा कटाक्ष होता. अशी आजीची शिस्त होती.

3) विरुद्धार्थी शब्दांच्या योग्य जोड्या जुळवा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| 1) आळस | अ) अनास्था |
| 2) आदर | आ) दुरावा |
| 3) आस्था | इ) उत्साह |
| 4) आपुलकी | ई) अनादर |

उत्तर :

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| 1) आळस | इ) उत्साह |
| 2) आदर | ई) अनादर |
| 3) आस्था | अ) अनास्था |
| 4) आपुलकी | आ) दुरावा |

4) खालील वाक्यांतील वाक्प्रचार शोधून अधोरेखित करा.

अ) सहलीच्या वेळी शिस्तभंग होऊ नये याकडे शिक्षकांना कटाक्ष असतो.
उत्तर :
सहलीच्या वेळी शिस्तभंग होऊ नये याकडे शिक्षकांना <u>कटाक्ष असतो</u>.

आ) दोन व्यक्तींतील संवादाचा तिसऱ्या व्यक्तीने कोनासा घेणे अयोग्यच.
उत्तर :
दोन व्यक्तींतील संवादाचा तिसऱ्या व्यक्तीने <u>कोनासा घेणे</u> अयोग्यच.

इ) कारण नसताना हुकमत गाजवणाऱ्या व्यक्ती इतरांच्या नजरेतून उतरतात.
उत्तर :
कारण नसताना हुकमत गाजवणाऱ्या व्यक्ती इतरांच्या <u>नजरेतून उतरतात</u>.

5) कंसातील विशेषणांच्या योग्य ठिकाणी वापर करून वाक्ये पुन्हा लिहा.

(खूप, त्याचा, आंबट, अधिक, द्विगुणित, आमची)

अ) समुद्रकिनारी ...................... सहल गेली होती.
उत्तर :
समुद्रकिनारी **आमची** सहल गेली होती.

आ) खूप दिवसांनंतर मैत्रिणीला पाहून राजश्रीचा आनंद .................. झाला.
उत्तर :
खूप दिवसांनंतर मैत्रिणीला पाहून राजश्रीचा आनंद **द्विगुणित** झाला.

इ) विजय अजयपेक्षा .................... चपळ आहे.
उत्तर :
विजय अजयपेक्षा **अधिक** चपळ आहे.

ई) रवीला ...................... कैऱ्या खायला खूप आवडतात.
उत्तर :
रवीला **आंबट** कैऱ्या खायला खूप आवडतात.

उ) मला गाणी ऐकण्याची ................... आवड आहे.
उत्तर :
मला गाणी ऐकण्याची **खूप** आवड आहे.

ऊ) राजू कबड्डी छान खेळत होता; परंतु ..................... पाय अचानक मुरगळल्याने तो बाद झाला.
उत्तर :
राजू कबड्डी छान खेळत होता; परंतु **त्याचा** पाय अचानक मुरगळल्याने तो बाद झाला.

6) खालील शब्दांचे दोन स्वतंत्र अर्थ लिहून चौकटी पूर्ण करा.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | ← | वर | → |
| आ) | ← | ग्रह | → |
| इ) | ← | काठ | → |
| ई) | ← | अभंग | → |

उत्तर :

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | नवरा ← | वर | → आशीर्वाद |
| आ) | समज ← | ग्रह | → सूर्यमालेतील गोल |
| इ) | किनारा ← | काठ | → पदर |
| ई) | न भंगणारे ← | अभंग | → एक वृत्त |

7) स्वमत

अ) 'आमची ढाळज म्हणजे गावाचं वर्तमानपत्र होतं' या वाक्याचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.

उत्तर :

'आगळ' या कादंबरीच्या नायकाची आजी ही त्याच्या घराची सत्ताधीश होती. घरात तिचा वचक होता. घराबाहेरही तिच्या शब्दाला मान होता. दुपारपर्यंतच्या सर्व कामांचे नियोजन करून आजी ढाळजेत यायची. गल्लीतल्या बायकाही जमा व्हायच्या. निवडटिपण करता करता गप्पाटप्पा व्हायच्या. अनेक बातम्या, गुपिते उघड व्हायची. सगळ्याजणी बातम्यांवर चर्चा करीत. त्यातून बातम्यांची शहानिशा व्हायची.

वर्तमानपत्राचे वार्ताहर गावांतून बातम्या आणतात. संपादक शहानिशा करतात. मगच त्या बातम्या वर्तमानपत्रात छापल्या जातात. आजीच्या घराची ढाळज वर्तमानपत्र सारखीच होती. तिथे आलेल्या बातम्यांची शहानिशा झाल्यावरच बायका त्या बातम्या गावभर सांगायला मोकळ्या होत.

आ) तुलना करा/साम्य लिहा.

**आगळ** - वाड्याचे कवच, **आजी** - कुटुंबाचे संरक्षक कवच

उत्तर :

| आगळ | आजी |
|---|---|
| 1) वाड्याचे संरक्षक कवच<br>2) घराबाहेर जाता येत नाही.<br>3) रात्री आधार. भीती वाटत नाही. | 1) कुटुंबाची संरक्षक कवच<br>2) शब्दाबाहेर जाता येत नाही.<br>3) कठीण प्रसंगात आधार. तिच्यामुळे कुटुंब निर्भय. |

इ) पाठात चित्रित झालेल्या एकत्र कुटुंब पद्धतीबाबतचे तुमचे विचार स्पष्ट करा.

उत्तर :

पाठात चित्रित झालेल्या एकत्र कुटुंबपद्धतीबाबत माझे मत असे की त्यातल्या काही गोष्टी मला आवडल्या, चांगल्या वाटल्या, पण काही गोष्टीबद्दल माझे मत प्रतिकूल आहे.

**एकत्र कुटुंबपद्धती -** i) शिस्त लागते.

ii) वळण मिळते.

iii) समतेची वागणूक असते आणि

iv) भेदभाव नसतो.

v) संरक्षण मिळते.

ह्या सर्व चांगल्या गोष्टी पाठात चित्रित झाल्या आहेत.

पण त्याचवेळी आजी i) हुकूमशाही पद्धतीने वागते. 'आमच्या पिढीवर हुकूमत गाजवणाऱ्या आजीच्या .........'असे वाक्य पाठात आहे. ज्येष्ठांबद्दल प्रेम व आदर असावा, त्याची भीती वाटू नये.

ii) या पद्धतीमुळे व्यक्तिस्वातंत्र्याला बाधा निर्माण होत असे.

iii) प्रत्येक सूनेला सर्व कामे करता आली पाहिजेत आणि त्यांची कामे रोटेशनप्रमाणे बदलायची. म्हणजे स्वयंपाकात ती सुगरण असेल तिने भांडी घासावित आणि धडधाकट सुनेने बेचव स्वयंपाक करायचा. अमिताभने क्रिकेट खेळावे व सचिनने अभिनव करावा असेच हे चित्र आहे. या मला न पटणाऱ्या गोष्टी आहेत.

ई) पाठाच्या शीर्षकाची समर्पकता थोडक्यात स्पष्ट करा.

उत्तर :

आगळ हे वाड्याचे संरक्षक कवच असते. आगळ लावली की घराबाहेर हुंदडण्याची सवयच बंद होते आणि रात्री मात्र तिचा आधार वाटतो. कुटुंबाच्या संदर्भात आजीही कुटुंबाची संरक्षक आहे. तिच्या दराऱ्यामुळे मुले बाहेर हुंदडायला जात नाही. आणि कठीण प्रसंगात मात्र तिचा आधार वाटतो. तिच्यामुळे निर्भय वातावरणात जगते. हे साम्य 'आजी : कुटुंबाचं आगळं' या शीर्षकातूनच दिसून येते. म्हणून हे शीर्षक निश्चितच समर्पक आहे.